☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जा.क्रं./ प्रेस नोट / 362 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 21 / 09 / 2025

# 1)खुन :–

**1)मुदखेड :–** दिनांक 19.09.2025 रोजी 20.30 वा. चे सुमारास, **मौजे माळकौठा ता. मुदखेड जि. नांदेड येथे**, यातील मयत नामे संजय हिरामण पवार, वय 23 वर्षे रा. माळकौठा ता. मुदखेड जि. नांदेड यास यातील आरोपी नामे 1. अमोल चांदू हनुमंते, 2. रितेश साहेबराव हनुमंते, दोघे रा. माळकौठा ता. मुदखेड यांनी संगणमत करून मयतास रोडवर कोळसा वाळत घातल्याच्या कारणावरून गंभीर मारहाण करून खुन केला. वगैरे **फिर्यादी संजय बाबुराव सोळंके वय 27 वर्षे, व्यवसाय लोहार काम रा. इस्लापूर ता. किनवट ह.मु. माळकौठा ता. मुदखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 163 / 2025 कलम 103(1),352,115(2),3(5) भारतीय न्याय संहिता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि / श्री कांबळे, मो.क्रं.** 9823925710 हे करीत आहेत. **नमुद गुन्हयातील आरोपींतास अटक करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.**

**2)मुखेड :–** दिनांक 15.09.2025 रोजी 23.00 वा. ते दिनांक 16.09.2025 रोजी 07.00 वा.चे दरम्यान, **मौजे तांदळी शिवार ता. मुखेड जि.नांदेड येथे**, यातील मयत नामे जनार्धन उत्तम जाधव, वय 35 वर्षे रा. तांदळी ता. मुखेड जि. नांदेड यास यातील आरोपी नामे उत्तम विठ्ठल जाधव, वय 60 वर्षे, रा. तांदळी ता. मुखेड याने यातील मयत याने दारू पिवून मारहाण केल्याच्या कारणावरून गंभीर मारहाण करून करून खुन केला. वगैरे **फिर्यादी पोउपनि / अभिजीत गणेशराव तुतुरवाड, नेम. पोस्टे मुखेड** यांनी दिलेल्या सरकार तर्फे फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 217 / 2025 कलम 103(1) भारतीय न्याय संहिता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / माने, मो.क्रं.** 9975008682 हे करीत आहेत.

# 2)दरोडा :–

**लिंबगाव :–** दिनांक 19.09.2025 रोजी 18.30 वा. चे सुमारास, **बोंडार बायपास रोडवर ता. जि.नांदेड येथे,** यातील फिर्यादी व साक्षीदार हे बोंडार बायपास येथे गप्पा मारत बसले असताना नंबर नसलेल्या तीन मोटार सायकलवर अनोळखी पाच ते सहा इसम त्यांचे जवळ येवून धाक दाखवून मारहाण करून फिर्यादी व साक्षीदार यांचे खिशातील नगदी 34,500 /–रूपये जबरदस्तीने काढून घेवुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी माधव संभाजी आरसुळे, वय 50 वर्षे व्यवसाय शेती रा. बोंडार ता.जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 163 / 2025 कलम 310(2),118(1),115(2),352 भारतीय न्याय संहिता–2023 कायदा सह कलम भाहका 4 / 25 प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / सय्यद, मो. नं.** 9767727127 हे करीत आहेत.

# 3)फसवणुक :–

**नांदेड ग्रामीण** :– दिनांक 07.06.2022 ते दि. 30.09.2022 दरम्यान, **सिडको नविन नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.नरसिंग हनमंतराव मेघमाळे, रा.बिलोली 2.अर्चना नरसिंग मेघमाळे, 3.सतीश अशोकराव गुडलवार, दोघे रा. पुर्णा रोड तरोडा नांदेड यांनी संगणमत करून यातील फिर्यादीच्या मुलास शासकीय कार्यालयात नौकरी लावून देतो असे म्हणुन नगदी व ऑनलाईन स्वरूपात एकुण 61,00,000 / –रूपये घेवून पोस्टाचे, बँकेचे बनावट नौकरीची ऑडर देवून फसवणुक केली.वगैरे **फिर्यादी पंडीत ग्यानोबा पापुले, वय 60 वर्षे, व्यवसाय शेती रा. सिडको नविन नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 906 / 2025 कलम 420, 465, 467, 468, 471, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि / श्री नाईक, मो.नं.** 9370842945 हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड